# विद्यापीठ ग्रंथालय, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

# दापोली, जि. रत्नागिरी ४१५ ७१२

जा.क्र.डॉबासाकोकृवि/वि.ग्रं/२३१/२०२३ दिनांक: ०९/०१/२०२३

## जडवस्तू संग्रहातील निर्लेखीत केलेल्या वस्तूंची बोलीद्वारे लिलाव करणेबाबत सुचना

## सन २०२२-२३

विद्यापीठ ग्रंथालय, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी यांचकडील जडवस्तू संग्रहातील निर्लेखीत वस्तू **''जेथे आहे जसे आहे तसे''** प्रत्यक्ष पहाणी तत्वावर जाहीर बोलीद्वारे लिलाव दिनांक: २४/०१ /२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. विद्यापीठ ग्रंथालय, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथे आयोजित करण्यात आलेला आहे. लिलावाच्या अटी व शर्ती तसेच लिलावाद्वारे विक्री करावयाच्या निरूपयोगी जडवस्तू संग्रहातील निर्लेखीत केलेल्या वस्तू **दिनांक ०९/०१/२०२३ ते २३/०१/२०२३ या कालावधीत कार्यालयीन कामाकाजाचे दिवशी सकाळी ०९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यत विद्यापीठ ग्रंथालय,डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ दापोली जि. रत्नागिरी येथे पहाण्यास मिळतील**. निरूपयोगी जडवस्तू संग्रहातील निर्लेखीत केलेल्या वस्तूंची लिलावाच्या अटी शर्ती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर **www.dbskkv.org** पहावयास मिळतील.

**अध्यक्ष**
**लिलाव समिती**
विद्यापीठ ग्रंथालय,
डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण
कृषि विद्यापीठ, दापोली

# जडवस्तू संग्रहातील निर्लेखीत केलेल्या वस्तूंची बोलीद्वारे लिलावाच्या अटी व शर्ती

१. लिलाव प्रक्रिया दिनांक **२४/०१/२०२३ रोजी सकाळी १०.००** वाजता बोली पध्दतीने सुरू करण्यात येईल. यास्तव **लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या ठेकेदाराने सकाळी ०९.३० वाजता लिलावाचे ठिकाणी हजर रहावे. तसेच १० मिनीट अगोदर अनामत रक्कम रू. ५०००/- लिलावाच्या ठिकाणी रोख स्वरूपात जमा करावी. लिलाव प्रक्रिया चालू झाल्यानंतर तसेच उशिराने येणाऱ्या ठेकेदारास लिलाव प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.**

२. सदरचा लिलाव सक्षम प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या लिलाव समितीचे देखरेखीखाली करण्यात येईल आणि सदर समितीचा निर्णय अंतिम राहील.

३. जडवस्तू संग्रहातील निर्लेखीत केलेल्या वस्तूंची लिलावाद्वारे विक्री **"जेथे आहे जसे आहे तसे"** या तत्वावर करण्यात येणार आहे.

४. **लिलावाद्वारे विक्री करावयाच्या जडवस्तू संग्रहातील निर्लेखीत केलेल्या वस्तू दि. ०९/०१/२०२३ ते दि.२३/०१/२०२३ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ०९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विद्यापीठ ग्रंथालय,डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ दापोली येथे पहाण्यास मिळतील.**

५. ज्या ठेकेदाराची बोली सर्वात जास्त असेल त्या ठेकेदारास लिलावाची पूर्ण रक्कम अथवा बोली केलेल्या रक्कमेच्या **५० टक्के रक्कम दिनांक २४/०१/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत सहाय्यक नियंत्रक (१), डॉ.बा.सा.कोंकण, कृषि विद्यापीठ, दापोली यांचे कार्यालयात रोखीने अथवा धनाकर्षाद्वारे जमा करावी लागेल. (धनाकर्ष Comptroller, Dr.Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth, Dapoli** यांचे नावे **Paid in Dapoli** असा काढण्यात यावा) आणि तद्नंतर एक आठवडयाच्या आत उर्वरित रक्कम जमा करून लिलावातील जडवस्तू संग्रहातील निर्लेखीत वस्तू स्वखर्चाने उचल करणे आवश्यक राहिल. अन्यथा प्रथम भरणा केलेली ५० टक्के रक्कम जप्त करण्यात येईल व त्याबाबत कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

६. लिलावामध्ये विक्री केलेल्या साहित्याबाबत नंतर कोणत्याही तक्रारीची दखल हे कार्यालय घेणार नाही.

७. लिलावातून विक्री केलेले साहित्य वाहतुक करतांना विद्यापीठ मालमत्तेचे कोणतेही नुकसान होणार नाही याची दखल लिलावधारकाने घेणेत यावी. विद्यापीठ मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास झालेल्या नुकसानीची वसुली लिलावधारकाकडून केली जाईल. लिलाव झाल्यावर सर्व साहित्य नेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची राहिल. लिलावधारकाने लिलाव साहित्य आठ दिवसाच्या आत संबंधित कार्यालयीन अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली स्वखर्चाने कार्यालयीन वेळेत घेवून जाणे बंधनकारक आहे.

८. लिलावाच्या अटी व शर्ती **www.dbskkv.org** या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पहाण्यास मिळतील.

९. सदरचा लिलाव करताना कोवीड-१९ प्रादुर्भावामुळे शासनाच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करून योग्य ती दक्षता घेण्यात येईल.

१०. एक किंवा सर्व लिलाव मंजुरीचा अथवा नाकारणेचा अधिकार जडवस्तू लिलाव समिती यांना राहील.

**अध्यक्ष**
**लिलाव समिती**
विद्यापीठ ग्रंथालय,
डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण
कृषि विद्यापीठ, दापोली

प्रत: माहितीसाठी सस्नेह अग्रेषित -

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२. मा. शिक्षण संचालक, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली.
३. मा. संशोधन संचालक, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली.

४. मा. संचालक, विस्तार शिक्षण, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली.
५. मा. विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली.
६. मा. कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना कळविण्यात येते की, लिलालाच्या दिवशी लिलावाच्या ठिकाणी आपला प्रतिनिधी उपस्थित ठेवावा.
७. मा. नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना कळविण्यात येते की, लिलालाच्या दिवशी लिलावाच्या ठिकाणी आपला प्रतिनिधी उपस्थित ठेवावा.
८. मा.सहाय्यक नियंत्रक (१), डॉ.बा.सा.कोंकण, कृषि विद्यापीठ, दापोली.
९. मा. सहयोगी अधिष्ठाता, कृ.म.वि.दापोली/कृ.अ.त..म.दापोली/ व म.दापोली/उ.वि.म.दापोली/ सुरक्षा अधिकारी, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी यांना कळविण्यात येते की, लिलावाच्या दिवशी लिलावाच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात यावी.
**१०.प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करण्यात यावी.**
११.विद्यापीठ ग्रंथालय प्रभारी अधिकारी यांनी लिलावधारकांना सदरचे साहित्य पाहणेसाठी आपला प्रतिनिधी नेमावा आणि सहाय्यक ग्रंथपाल/ग्रंथालय सहाय्यक, विद्यापीठ ग्रंथालय, डॉ.बा.सा.को.कृषि विद्यापीठ, दापोली यांनी लिलावधारकांना नमुद वेळेत व कालावधीत यादीमधील साहित्य दाखविण्यात यावे.
१२. नोटीस बोर्ड, प्रशासकीय कार्यालय, दापोली.
१३. दापोली नगरपंचायत, दापोली/ग्रामपंचायत, जालगांव/ग्रामपंचायत, गिम्हवणे.